त्रिमुर्ती शिक्षण संस्थेचे
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला
व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान
महाविद्यालय,साक्री जि.धुळे ४२४३०४

Trimurti Shikshan Sanstha,Sakri
Smt. Vimalbai Uttamrao Patil Arts
& Late Dr. Bhaskar Sadashiv Desale
Science College, Sakri Dist. Dhule 434304

नॅक प्रमाणित

- Email : vimalbaipatilcollege@gmail.com
- Web Site : www.vupabsdscsakri.co.in
- Phone : (02568) 240462
- Fax : 02568-240462

Principal
Dr. P. S. Sonawane
M.A.,Ph.D.
Email. pandharinath112@gmail.com
Mob.9404972944

**7.2.1: Describe two best practices successfully implemented by the Institution as per NAAC format provided in the Manual.**

**BEST PRACTICE -II (SEED SOWING AND TREE PLANTATION AT COLLEGE CAMPUS AND ADOPTED VILLAGE RAMNAGAR )**

**Response:- Best Practice-II**

**Title of the Practice:-** Seeds Sowing and Plantation

**2. Objectives of the Practice:-**

To establish a seed bank at college level and plant it on the hill side of adopted village Ramnagar.

To educate the students and society about the importance of seed sowing and tree plantation.

To start the various types of conservation such as tree conservation, soil conservation, water conservation, bird and animal conservation.

**3. The Context:-** The process of sowing seeds and plantation was started with the help of college students, and alumni. During the academic year 2020-21, the biological disaster of Corona had spread globally. In this background, a lockdown was imposed by the government. Due to the fact that the issue of sustainable environment was especially discussed in the rural areas during this disaster, former students of our college and Prin. Dr. P.S. Sonawane held a meeting together with help of Prof. Ajay P. Nandre on social media and

decided to collect seeds and plant seeds & plant trees on the hill, when the impact of this disaster was less, they visited the hills in the area with their own vehicles keeping a safe distance and they chose the hill of Ramnagar.

**4. The Practice:-** We collect the seeds from the students for sowing at the adopted barren hill of Ramnagar. Keeping in mind the Corona disaster, instead of coming to the college, the students who were interested in the environment were selected and this information was given to all the students. Coordination between them was done over the phone from time to time.

**5. Evidence of Success:-** We have seen positive benefits in various ways, the tree plantation on the hill stopped the soil erosion, similarly, by increasing the amount of grass and thorny plants by stopping the grazing, the good work of water conservation was successful. It Increases the number of different types of birds, bees, insects and wild animals. Staff, Students, Alumni and Public participation has started, direct participation and cooperation of tribals, tree success rate is very good, ban on grazing cattles through Gram Panchayat, good cooperation and actual participation of forest department, positive attitude of villagers in seed sowing and tree planting. direct participation of nature lovers from the district in various types of cooperation.

**6. Problems Encountered and Resources Required:-** In the beginning, various problems were encountered like uprooting of planted trees, some people showing private ownership rights over this hill area, Hill is 1000 feet high and completely barren. The local herdsmen and tribal people oppose plantation work, and to ban on wildlife hunting. In the beginning, there was a lack of water, a lack of public cooperation, and initially the wrong remark of people to our work. etc. Requires hard work because it is very difficult to survive plants on hillsides.

| BEST PRACTICE -2 (SEED SOWING AND TREE PLANTATION AT COLLEGE CAMPUS AND ADOPTED VILLAGE RAMNAGAR ) | | |
|---|---|---|
| **Sr. No.** | **Name of the Program and Activity** | **Page No.** |
| 1. | Vruksha Lagwad (Tree Plantation) | 5 |
| 2. | Tree Adoption Scheme by the Teachers in college Campus (31 August 2020) | 6-9 |
| 3. | Tree Plantation Programme in College Campus with auspicious hands of Hon’ble Dr. Mangalatai B. Desale. | 10-11 |
| 4. | Tree Plantation by Mr. Nitin Salunke, Dr. J.Z.Salunkhe,Prof. S.B.Sonawane, Dr. K.D.Ahire and NSS Volunteers in the Adopted Village. | 12-13 |
| 5. | Tree Plantation by the Forest Officer Mr. Sonawane, the Principal Dr. Sonawane and the teachers in the College Campus | 14 |
| 6. | Dr. Jahagirdar Salunkhe is presenting the importance of the tree plantation in the presence of the Forest Officer, The Principal, professors and the volunteers. | 15 |
| 7. | Celebration of Tree Plantation Week, inaugurated by Hon’ble Dr. Mangalatai B. Desale, the Secretary of the Institution. | 16-19 |
| 8. | Principal Dr. P. S. Sonawane is Planting in the presence of Hon'ble Secretary Dr. Mangalatai B. Desale | 20 |
| 9. | Tree Plantation with the hands of Res.Prin.Dr.P.S.Sonawane and Teachers in College Campus | 21 |
| 10. | Tree Plantation with the hands of Hon’ble Dr. Mangalatai Desale in Adopted Village Ramnagar | 22-30 |
| 11. | Seed Collection and Sowing Campaign (2020-21) | 31-32 |
| 12. | The social worker Mr. Sureshbhau Parakh, Prof. A.P.Nandre and Alumni are sowing seeds at the hillside of Ramnagar | 33-37 |

| | | |
|---|---|---|
| **13.** | **Moral support with actual participation of the local peoples for seeds sowing and tree plantation on hill of Ramnagar** | **38-40** |
| **14.** | **Tree Plantation Programme** | **41-44** |
| **15.** | **Evidences of Success** | **44- 49** |
| **16.** | **Tree Plantation Programme on the hill of Ramnagar in the presence of Mr. Suhas Bhau Sonawane and NSS Programme Officers.** | **50-67** |
| **17.** | **One Day NSS Camp at Ramnagar Hill** | **68-75** |
| **18.** | **Group Photo of the Volunteer Participants at University level One Day Camp at Adopted Village Ramnagar with the NSS University Officer Dr. Sachin Nandre, Social worker Mr. Sureshbhau Parakh, Prin. B.M.Bhamare, Mr. Bhamare Prof. Gharate, Prof. Kulkarni, Prof.J.U.Patil Prof. Nandre, Dr.Wagh** | **76** |
| **19.** | **Prin. Mr. B.M.Bhamare is guiding the students regarding the importance of seed sowing and Tree Plantation in University level One Day Camp at Adopted Village Ramnagar** | **77-78** |
| **20.** | **Evidences of Success of the Best Practice** | **79-88** |



**Dr.J.Z.Salunkhe**
Co-ordinator
IQAC
T.S.S.'s Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri, Tal.Sakri, Dist.Dhule

Sakri (Dhule)
T.S.S's Smt. V. U. Patil Arts and Late Dr. B. S. Desale Science College

**Dr. P. S. Sonawane**
PRINCIPAL
T.S.S's.Smt.V.U.Patil Arts &
Late Dr.B.S.Desale Science College
Sakri,Tal.Sakri,Dist.Dhule

## (Seed Sowing and Tree Plantation)

**Tree Plantation in College Campus with auspicious hands of Hon'ble Dr. Mangalatai B. Desale, Prin. Dr. P.S.Sonawane and Teachers. ( Tree Plantation 08.07.2020)**






# Celebration of Tree Adoption Scheme by the Teachers in college Campus


## (31 August 2020)















**Tree Plantation Programme in College Campus with auspicious hands of Hon’ble Dr. Mangalatai B. Desale (01.08.2019)**







Latitude: 20.995637
Longitude: 74.306807
Elevation: 441.04m
Accuracy: 3.2m
Time: 08-01-2019 10:56
Powered by NoteCam



**Tree Plantation by Mr. Nitin Salunke, Dr. J.Z.Salunkhe,Prof. S.B.Sonawane, Dr. K.D.Ahire and NSS Volunteers in the Adopted Village. ( 19 Dec. 2019)**







2019.12.19 11:07


2019.12.19 11:40

**Tree Plantation by the Forest Officer Mr. Sonawane, the Principal Dr. Sonawane and the teachers in the College Campus (1 July 2018)**









**Dr. Jahagirdar Salunkhe is presenting the importance of the tree plantation in the presence of the Forest Officer, The Principal, professors and the volunteers.**



**Celebration of Tree Plantation Week, inaugurated by Hon'ble Dr. Mangalatai B. Desale, the Secretary of the Institution. (01 July 2017)**







त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे
ता.साक्री जि.धुळे


अंतर्गत


मूर्ती शिक्षण संस्थेचे
मलबाई उत्तमराव पाटील कला व
शिव देसले विज्ञान महाविद्यालय,
ता.साक्री जि.धुळे
य सेवा यो
गवड


मूर्ती शिक्षण संस्थेचे
लबाई उत्तमराव पाटील कला व
व देसले विज्ञान महाविद्यालय साक्री
ता.साक्री जि.धुळे

**Principal Dr. P. S. Sonawane is Planting in the presence of Hon'ble Secretary Dr. Mangalatai B. Desale**




श्रीमती विमलबाई
कला व
साक्री
NATIONAL SERVICE SCHEME



# Tree Plantation with the hands of Res.Prin.Dr.P.S.Sonawane and Teachers in College Campus






# Tree Plantation with the hands of Hon'ble Dr. Mangalatai Desale in Adopted Village Ramnagar (24 July 2021)





साक्री (अनिल देसले, दै. धुळे दवंडी): राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत काल (दि.४) श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै डॉ भास्कर सदाशिव दिसले विज्ञान महाविद्यालयाने मालपुर येथील रामनगर येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे व राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. कैलास वाघ, डॉ विजय देसले, डॉ अभिजीत भामरे, डॉ दिनेश माळी, डॉ. शरद सोनवणे, प्रा गुलाबसिंग पावरा, प्रा अजय नांद्रे, प्रा दिनकर पाटील, व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

## Tree Plantation in One Day NSS Camp at Ramnagar Hill






जळगाव
तरुण भारत
Main Edition | 2021-07-25 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# साक्री महाविद्यालयात पंधरवडानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

**नवापूर** : श्रीमती विमलाबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. बी. एस. देसले विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयाचे प्रथम प्राचार्य ॲड. दादासाहेब शरदराव भामरे व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले (संस्थापक त्रिमूर्ती शिक्षण संस्था) यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करून पंधरवडा साजरा केला जात आहे. त्याचाच एक भाग २४ रोजी महा.प्रथम प्राचार्य भामरे यांची जयंती साजरा करण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी अध्यक्ष म्हणून संस्थेच्या सचिव डॉ. मंगलाताई देसले या उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी. एस. सोनवणे, मुंबई पोलीसचे पी.आय. सचिन शेवाळे, माजी प्राचार्य बी.एम.भामरे, उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते सुरेश पारख, सुहास सोनवणे, माजी सरपंच पंकज भामरे मुख्याध्यापक पाटील लाभले होते.

याप्रसंगी सचिन शेवाळे पोलीस निरीक्षक मुंबई पोलीस यांनी त्यांचा दादासाहेबांशी असणाऱ्या संबंधांची माहिती दिली डॉ. विजय देसले यांनी भामरे प्रथम प्राचार्य असतानाचे कार्याविषयी माहिती दिली. प्राचार्य डॉ. पी.एस.सोनवणे यांनी त्यांच्या सामाजिक कार्याविषयी माहिती दिली. माजी प्राचार्य बी.एम.भामरे यांनी दादांच्या कार्याची माहिती दिली व निसर्ग मित्र समितीला डॉ. अभिजित भामरे यांनी



वडाचे दहा फूट उंचीचे झाडे भेट देऊन कार्यक्रम साजरा करत असल्याने त्यांनी कौतुक केले. सामाजिक कार्यकर्ते सुरेश पारख यांनी दादासाहेबांच्या सामाजिक शैक्षणिक व राजकीय कार्याविषयी माहिती दिली. सूत्रसंचालन डॉ. कैलास वाघ यांनी केले. आभार सुहास सोनवणे यांनी मानले. याप्रसंगी संस्थेच्या सचिव मंगलाताई देसले व प्रमुख अतिथींच्या असते वृक्षारोपण केले. यासाठी परिवारातील सदस्य डॉक्टर अभिजीत भामरे, ॲड. वनिता भामरे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, मीनाक्षी नांद्रे, माजी विद्यार्थी दत्तात्रय ठाकरे, कल्पेश शिंदे, प्रशांत पवार यांनी प्रयत्न केले.






2021.07.24 12:26


2021.07.24 12:26


2021.07.24 12:25


2021.07.24 12:27

जळगाव
तरुण भारत
Main Edition | 2021-07-24 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# साक्री महाविद्यालयात आजी विद्यार्थ्यांनी केले बीज संकलन तर माजी विद्यार्थ्यांनी केले रोपण

## विमलबाई पाटील महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम

**तभा वृतसेवा**
**नवापूर, २३ जुलै**

विमलबाई उत्तमराव पाटील कला, कै. डॉ. बी एस देसले विज्ञान महाविद्यालयातील व निसर्ग मित्र समिती साक्री येथील पर्यावरणशास्त्र विभागाच्यावतीने स्थापन केलेल्या बीज बँकेत माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात बीज संकलन केले.

रामनगर येथील डोंगरावर निसर्ग मित्र समिती वृक्ष लागवड व संवर्धनाचे कार्य करत आहे याच मोहिमेला महाविद्यालय वेळोवेळी सहकार्य करत आहे. २२ जुलै रोजी मालपुर येथील माजी विद्यार्थीही या डोंगरावर वनराई निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. याचाच भाग म्हणून त्यांनी महिलांनाही या कार्यासाठी आकर्षित केले व त्यांनाही या कार्यक्रमात सहभागी करून सीताफळ, चिंच, बोर, शिवम, बाभूळ, जांभूळ, शेवरी इत्यादी बियांचे डोंगर पायथ्यालगत रोपण केले यासाठी हर्षदा पाटील, सरिता बोरसे, दिलीप भिल, संजय भिल हे विद्यार्थी या बीजारोपणत सहभागी होते.



मोहिनी सोनवणे, सरिता सोनवणे, रंजना सोनवणे, निकिता नांद्रे, भावना नांद्रे, रमाबाई बिल, कानुबाई भील, सोनल आदींनी या विद्यार्थ्यांना सहकार्य केले. या प्रक्रियेत डॉ. अभिजीत भामरे व प्रा. अजय नांद्रे यांनी बीज रोपण करण्यासाठी मार्गदर्शन केले. संस्थेचे सचिव डॉ. मंगलाताई देसले व प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे यांनी या कार्याचे कौतूक केले.


त्रिमुर्ती शिक्षण संस्थेचे
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय
2021.07.22 14:19


त्रिमुर्ती शिक्षण संस्थेचे
श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय
2021.07.22 14:18

# Seed Collection Campaign (2020-21)

जळगाव
तरुण भारत
Main Edition | 2021-07-17 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com


## गाव शिवार वार्ता...

## साक्री महाविद्यालयाची बीज संकलन मोहीम प्राचार्यांकडे हस्तांतरित; बीज बँकेचे सर्वत्र कौतुक



**नवापूर** : श्रीमती विमलताई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ. बी.एस.देसले विज्ञान महाविद्यालयातील पर्यावरण शास्त्र अभ्यास विभागाच्यावतीने गेल्या दोन वर्षापासून बीज बँकेची स्थापना करण्यात आली आहे या बँकेसाठी प्रथम वर्ष कला व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी बीज गुणांचा प्रकल्प अहवाल सक्तीचा आहे यासाठी आमच्या महाविद्यालयातील पर्यावरणशास्त्र विभागाचे समन्वयक प्रा. ए.पी .नांद्रे यांनी अहवाला ऐवजी एका विद्यार्थ्याने कोणत्याही झाडाच्या कमीत कमी २० बिया बँकेसाठी दान द्यायचे असे धोरण निश्चित झाले आहे त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी मोठा प्रतिसाद दिला व बीच बँकेत विविध प्रकारच्या बियांचे संकलन झाले यात साक्री तालुक्यातील विद्यार्थ्यांकडून सिताफळ, रामफळ, लिंब व जांभूळ च्या बियांचा पुरवठा झाला तर सातपुडा पर्वत रांगेतील नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांकडून शिवम, इंग्रजी चिंच, काशीद इत्यादी बियाण्यांचा पुरवठा झाला . मालपुर येथील रामनगर येथील वस्तीजवळ असणारा डोंगर निसर्ग मित्र समिती साक्री यांनी दत्तक घेतला आहे. पर्यावरण विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या मार्फत या डोंगरावर बियांचे रोपण वेळोवेळी केले जाते व आताही संकलित झालेले बियांचे रोपण येथे केले जाणार आहे, असे मा. प्राचार्य डॉ. पी.एस. सोनवणे यांनी जाहीर केले या बियांची हस्तांतरण मा. प्राचार्य डॉ. पी एस सोनवणे यांच्याकडे पर्यावरण विभाग प्रमुख प्रा. ए.पी. नांद्रे यांच्यावतीने करण्यात आले याप्रसंगी डॉ. झे. झेड, साळुंके डॉ. डी डी माळी प्रा. ए. एन. भदाणे शिक्षकेत्तर कर्मचारी डी.जे. पाटील हेमंत तोरवणे, जितेंद्र काकुस्ते हे उपस्थित होते.

# Seed Collection and Sowing Campaign (2021-22)





**मालपूर : रामनगरच्या ओसाड डोंगरावर बियांची लागवड करताना माजी विद्यार्थी.**

# रामनगरला डोंगरावर वृक्षारोपणासह बियांची लागवड

**म्हसदी :** साक्री येथील विमलबाई उत्तमराव पाटील कला व (कै.) डॉ. बी. एस. देसले विज्ञान महाविद्यालयातील प्रा. अजय नांद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व निसर्गमित्र समितीतर्फे रामनगरच्या ओसाड डोंगरावर वृक्षारोपण करण्यात आले. सोशल मीडियाच्या माध्यमातून विविध वृक्षांच्या बियांची व रोपांची मदत मागण्यात आली होती. त्याचाच एक भाग म्हणून या विद्यार्थ्यांना झाडे दिली. डोंगर परिसरात समाजातील पर्यावरणप्रेमींना बोलावून यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी दोन हजार लिंबाच्या बियांची लागवड करण्यात आली. संस्थेच्या सचिव डॉ. मंगला देसले व प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे यांनी प्रेरणा दिली. प्रा. अजय नांद्रे यांच्या सहकार्याने माजी विद्यार्थी मिलिंद नांद्रे, जयेश सोनवणे, कल्पेश शिंदे, निनाद अहिरराव, हृषीकेश सोनवणे व निसर्गमित्र समितीच्या सदस्यांनी वृक्षारोपण केले. देवीदास बच्छाव, प्रशांत पवार, किसन सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

**The social worker Mr. Sureshbhau Parakh, Prof. A.P.Nandre and Alumni are sowing seeds at the hillside of Ramnagar**














जळगाव
तरुण भारत

Main Edition | 2021-07-08 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# साक्री महाविद्यालयाचा ऑक्सिजन पार्क निर्माण करण्याचा संकल्प

**नवापूर** : विमलबाई उत्तमराव पाटील कला कै. डॉ. बी एस देसले विज्ञान महाविद्यालयातील प्रा. अजय नांद्रे यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील माजी विद्यार्थी व निसर्ग मित्र समिती साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने मालपुर येथील रामनगरच्या ओसाड डोंगराचे वनात रूपांतर करण्याचे स्वप्न पाहिले आहे.

सोशल मीडियाच्या माध्यमातून विविध वृक्षांच्या बियांची व रोपांची मदत मागितली जाते व अनेक पर्यावरणप्रेमी त्यांना लहान स्वरूपात मदत करायला लागले त्याचाच एक भाग म्हणून या विद्यार्थ्यांना काही झाडे एकादा त्याने दिली व त्यांनी दिनांक ५ रोजी डोंगर परिसरात समाजातील पर्यावरण प्रेमी लोकांना



बोलावून यांच्या हस्ते या वृक्षांची लागवड डोंगर पायथ्यापासून सुरुवात केली तसेच बीजारोपण याचा संकल्प त्यांनी पाऊस पडतो तो पर्यंत करण्याचे नियोजन केले त्या अनुषंगाने काटेरी झुडपांचा सानिध्यात २००० लिंबाच्या बियांची लागवड केली. यासाठी संस्थेचे सचिव डॉ. मंगलाताई देसले व प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे यांनी प्रेरणा दिली.

महाविद्यालयाचे प्रा. अजय नांद्रे यांच्या सहकार्याने माजी विद्यार्थी मिलिंद नांद्रे, जयेश सोनवणे, कल्पेश शिंदे , निनाद अहिरराव, ऋषिकेश सोनवणे या विद्यार्थ्यांनी निसर्ग मित्र समितीच्या सदस्यांच्या माध्यमातून प्रत्यक्षपणे वृक्षारोपनाचा कार्यक्रम केला. यासाठी बीजसंकलन करण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी देविदास बच्छाव, प्रशांत पवार, किसन सुर्यवशी यांनी सहकार्य केले.

**Moral support with actual participation of the local peoples for seeds sowing and tree plantation on hill of Ramnagar**





जळगाव
तरुण भारत

Main Edition | 2021-07-24 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# साक्री महाविद्यालयात आजी विद्यार्थ्यांनी केले बीज संकलन तर माजी विद्यार्थ्यांनी केले रोपण

## विमलबाई पाटील महाविद्यालयाचा अभिनव उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नवापूर, २३ जुलै**

विमलबाई उत्तमराव पाटील कला, कै. डॉ. बी एस देसले विज्ञान महाविद्यालयातील व निसर्ग मित्र समिती साक्री येथील पर्यावरणशास्त्र विभागाच्यावतीने स्थापन केलेल्या बीज बँकेत माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात बीज संकलन केले.

रामनगर येथील डोंगरावर निसर्ग मित्र समिती वृक्ष लागवड व संवर्धनाचे कार्य करत आहे याच मोहिमेला महाविद्यालय वेळोवेळी सहकार्य करत आहे. २२ जुलै रोजी मालपुर येथील माजी विद्यार्थीही या डोंगरावर वनराई निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. याचाच भाग म्हणून त्यांनी महिलांनाही या कार्यासाठी आकर्षित केले व त्यांनाही या कार्यक्रमात



सहभागी करून सीताफळ, चिंच, बोर, शिवम, बाभूळ, जांभूळ, शेवरी इत्यादी बियांचे डोंगर पायथ्यालगत रोपण केले यासाठी हर्षदा पाटील, सरिता बोरसे, दिलीप भिल, संजय भिल हे विद्यार्थी या बीजारोपणत सहभागी होते.

मोहिनी सोनवणे, सरिता सोनवणे, रंजना सोनवणे, निकिता नांद्रे, भावना नांद्रे, रमाबाई बिल, कानुबाई भील, सोनल आदींनी या विद्यार्थ्यांना सहकार्य केले. या प्रक्रियेत डॉ. अभिजीत भामरे व प्रा. अजय नांद्रे यांनी बीज रोपण करण्यासाठी मार्गदर्शन केले. संस्थेचे सचिव डॉ. मंगलाताई देसले व प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे यांनी या कार्याचे कौतूक केले.





# Tree Plantation Programme















**Evidences of Success**

















दैनिक
(Marathi Daily)
विद्यानंद पाटील
# मर्डर
मंगळवार दि.११-१०-२०२२

# साक्रीतील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो विभागातर्फे वृक्षारोपण व श्रमसंस्कार शिबीर

**कासारे, • दै.मर्डर न्यूज •**

साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ. बी. एस. देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साक्री तालुक्यातील मालपूर कासारे नजीकच्या रामनगर या दत्तकगावी विद्यापीठस्तरीय वृक्ष लागवड व श्रम संस्कार असे एक दिवशीय शिबीर संपन्न झाले.




साक्री तालुका निसर्ग मित्र समिती तसेच साक्री तालुक्यातील सर्व सहा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनांचे एकक व कवयित्री बहिणाबाई चौधरी उ. म. वीद्यापिठ जळगांव यांच्या संयुक्त विद्यमाने रामफळ, सिताफळ, गुलमोहर, पिंपळ आदी ७०० वृक्षांची लागवड रामनगर येथील डोंगरावर करण्यात आली. परिसरातील आदिवासी लोकांना भविष्यात आर्थिक फायदा उपलब्ध व्हावा, रोजगाराची समस्या सुटावी तसेच वृक्ष लागवडीतून पर्यावरण संवर्धन अशा विविध हेतूने विविध फळझाडांची लागवड करण्यात आली.

शिबिराचे उद्घाटक म्हणून क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील रासेयोचे संचालक डॉ. सचिन नांद्रे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी निसर्ग मित्र समितीचे उपाध्यक्ष प्राचार्य बी. एम. भामरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून निसर्ग मित्र समितीचे कार्याध्यक्ष व साक्री तालुका प्रवासी महासंघाचे अध्यक्ष सुरेश पारख होते. तसेच साक्री तालुका रासेयो प्रमुख डॉ. हेमंत पाटील, पिंपळनेर महाविद्यालयाचे रासेयो प्रमुख डॉ. घरटे, डॉ. साळवे, डॉ. कदम, प्रा. प्रदीप साळवे, निजामपूर महाविद्यालयाचे रासेयो सहाय्यक कार्यक्रमाधिकारी डॉ. कुलकर्णी, दहिवेल महाविद्यालयाचे रासेयो प्रमुख डॉ. पाटील, सी.गो पाटील महाविद्यालयाचे रासेयो प्रमुख राठोड, टीव्ही चॅनलचे प्रकाश वाघ उपस्थित होते. या शिबीराच्या यशस्वीतेसाठी निसर्ग मित्र समितीचे कार्याध्यक्ष व उद्योजक सुरेश पारख, मालपुरचे माजी सरपंच पंकज भामरे, सी.जी.भामरे, नवजीवन देवरे, मनोहर भामरे, सुहास सोनवणे, विलास देसले, सुनील भामरे, जयेश सोनवणे, भूषण भामरे, नितीन सोनवणे, कैलास जाधव, सागर खैरणार, मिलिंद नांद्रे आदींनी सहकार्य केले. सूत्रसंचालन डॉ. दिनेश माळी यांनी तर, प्रास्ताविक डॉ. कैलास वाघ यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन व नियोजन प्रा. डॉ. अजय नांद्रे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ.अभिजित भामरे यांनी करुन दिला. आभार डॉ. मनीषा पाटील यांनी मानले.

**Tree Plantation Programme on the hill of Ramnagar in the presence of Mr. Suhas Bhau Sonawane and NSS Programme Officers.**













जळगाव तरुण भारत
Main Edition | 2021-07-22 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# साक्री महाविद्यालयाचे वृक्ष मित्र सोहळ्यात 'पर्यावरण व पर्यटन विकासात' योगदान

**तभा वृत्तसेवा**
**नवापूर, २१ जुलै**

निसर्ग मित्र समितीच्या वतीने नुकताच जिल्ह्याचा मेळावा आयोजित केलेला होता. याप्रसंगी आ. मंजुळाताई गावित, साक्री तालुक्यातील सी. गो. पाटील महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. आर.आर.अहिरे, विमलबाई महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. पी.एस. सोनवणे पिंपळनेर येथील पाटील महाविद्यालयातील प्राचार्य डॉ एस.टी. सोनवणे आणि दहिवेल येथील उत्तमराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.सी. अहिरे यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

कार्यक्रमातप्रसंगी निसर्ग मित्र समितीने या सर्व प्राचार्यांना विनंती केली की, आपल्या महाविद्यालयातील रा.से.यो.चे विद्यार्थी या डोंगरावर वृक्षलागवडीच्या कार्यास वेग प्राप्त करण्यासाठी कॅम्पचे आयोजन



करून उपलब्ध करून द्यावेत. तसेच आपणही या डोंगराचे दत्तकत्त्व स्वीकारुन तालुक्यातील डोंगराचे हिरवळीत रूपांतर करण्यासाठीचे भविष्यातील स्वप्नांना आपल्या माध्यमातून योगदान देण्याचे आवाहन केले.

प्राचार्यांच्यावतीने डॉ. आर. आर.अहिरे यांनी मनोगतात या प्रकल्पाचे कौतुक केले. केलेली मागणी कोरोना आपत्ती संपल्यावर १००% विद्यापीठाच्या परवानगीने पूर्ण करू असे मत व्यक्त केले या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित प्राचार्यांनी स्वतः सिताफळ, रामफळ, शिवम, चिंच, इत्यादी बीयांचे रोपण करून आपली सहमती असल्याचे दर्शविले. साक्री तालुक्यातील मालपुर गावाजवळील टेकडी जवळ वृक्षमित्र परिवारा मार्फत वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन कार्यक्रमांतर्गत तालुक्यातील आ. मंजुळाताई गावित यांच्या उपस्थित सर्व महाविद्यालयातील प्राचार्य उपस्थित होते.

















लोकमत
गुरुवार २२.७.२०२१
हॅलो धुळे
epaper.lokmat.com

विलास देसले

# रामनगराजवळील उजाड डोंगरावर वृक्षारोपण

## कासारे : निसर्गमित्र समितीचा उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कासारे :** मालपूर रामनगर भिल्ल वसाहती नजीकच्या डोंगरावर साक्री तालुका व कासारे मालपूरच्या निसर्गमित्र समितीतर्फे आमदार मंजुळा गावीत यांच्याहस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निसर्गमित्र समितीचे जिल्हाध्यक्ष डी.बी. पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रेमकुमार अहिरे, विजय वाघ, हर्षल महाजन, वैभव पाटील, आर.आर. पाटील, जि.प. सदस्य गोकुळसिंह परदेशी, शिवसेनेचे साक्री तालुका प्रमुख पंकज मराठे, सरपंच विशाल देसले, मालपूरच्या सरपंच घमाबाई भिल, उपसरपंच भारती भामरे, नयनेश भामरे, प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे, डॉ.पी.एस. सोनवणे, प्राचार्य डॉ.एस.टी. सोनवणे, प्राचार्य डॉ.एस.सी. अहिरे आदि उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी समितीचे जिल्हा उपाध्यक्ष विलास देसले, तालुकाध्यक्ष राकेश जाधव, उपाध्यक्ष प्राचार्य बी.एम. भामरे, कार्याध्यक्ष सुरेश पारख आदींनी परिश्रम घेतले.



रामनगर येथील डोंगरावर वृक्षारोपणप्रसंगी आमदार मंजुळा गावीत, डी.बी. पाटील, प्रेमकुमार अहिरे, विजय वाघ, हर्षल महाजन, वैभव पाटील आदी.





















जळगाव तरुण भारत
Main Edition | 2021-07-22 | Page- 2
epaper.tarunbharatjalgaon.com

# मालपूर ग्रा.पं., निसर्ग मित्र समितीतर्फे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा**
**नवापूर, २१ जुलै**

तालुक्यातील मालपुर ग्रामपंचायत व निसर्ग मित्र समिती साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने मालपुर येथील रामनगरच्या ओसाड डोंगराचे वनात रूपांतर करण्याचे स्वप्न पाहिले आहे. यासाठी सोशल मीडियाच्या माध्यमातून गावात विविध वृक्षांच्या बियांची व रोपांची मदत मागितली जाते. अनेक पर्यावरणप्रेमी मदत करायला नेहमी तयार असतात त्याचाच एक भाग म्हणून १८ रोजी या डोंगर परिसरात आ. मंजुळाताई गावित यांच्या उपस्थितीत सरपंच घमाबाई भिल, उपसरपंच श्रीमती भारतीताई भीमराव भामरे, माजी सरपंच व गटनेते नैनेश भामरे ग्रामपंचायत सदस्य प्रा.अजय नांद्रे, अशोक सोनवणे, किशोर भामरे, प्राचार्य भिलाजी देवरे, प्राचार्य बी.एम.भामरे, मनोहर भामरे, विलासबापू सोनवणे, सोनू बोरसे, विद्यानंद पाटील,जयेश सोनवणे, ऋषिकेश सोनवणे, मिलिंद नांद्रे, दीपक कुवर, माजी सरपंच पंकज



भामरे, कल्पेश शिंदे व जिल्ह्यातील निसर्ग समितीचे सदस्य पदाधिकारी या मान्यवरांच्या उपस्थित वृक्षांची लागवड आदिवासी वस्ती रामनगर येथे करण्यात आली.

कार्यक्रमास मालपुर ग्रामपंचायतिचे कर्मचारी कैलास जाधव, बंडू काकुस्ते, गणेश भामरे, किशोर जाधव यांचेही सहकार्य लाभले. मालपुर गावातील निसर्ग मित्र परिवार व ग्रामपंचायतीच्या वतीने येथील डोंगरावर वनराई निर्माण करण्याचे धोरण आखण्यात आले आहे.

यासाठी ग्रामपंचायतीच्या विहिरीवरून उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते रामराव सोनू नांद्रे यांच्या आर्थिक मदतीने पाईपलाईनद्वारे या डोंगरावर पाणी पोहोचवून खऱ्या अर्थाने ओसाड डोंगराचे वनात रूपांतर करण्याचे स्वप्न सर्वच निसर्गप्रेमींनी पाहिलेले आहे. त्यासाठी मालपुर ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आवश्यक ती मदत केली जाते व केली जाईल असे उपसरपंच श्रीमती भारतीताई भिमराव यांनी आश्वासन दिले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रामसेविका योगिता वच्छाव यांनी प्रयत्न केले.











* त्रिमुर्ती शिक्षण संस्थेचे *
श्रीमती विमलबाई उतमराव पाटील कला व
कै.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय
2021.07.22 14:18




अनिल देसले

# दवंडी

मंगळवार दि.११-१०-२०२२

## साक्री येथील विमलबाई कला व डॉ.बी.एस.देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे रामनगर येथे वृक्षारोपण व श्रम संस्कार शिबिर उत्साहात संपन्न

**साक्री (अनिल देसले,दै.धुळे दवंडी):** साक्री येथील श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ. बी. एस. देसले विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साक्री तालुकात्यील मालपूर कासारे नजीकच्या रामनगर या दत्तकगावी विद्यापीठ स्तरीय "वृक्ष लागवड व श्रम संस्कार" असे, एक दिवशीय शिबिर संपन्न झाले. साक्री तालुका निसर्ग मित्र समिती ,तसेच साक्री तालुक्यातील सर्व सहा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनांचे एकक व कवयित्री बहिणाबाई चौधरी उ. म. वीद्यापिठ जळगांव यांच्या संयुक्त विद्यमाने सातशे, रामफळ, सिताफळ, गुलमोहर, पिंपळ इत्यादी वृक्षांची लागवड रामनगर येथील डोंगरावर करण्यात आली.गेल्या तीन वर्षापासून निसर्ग मित्र समितीच्या वतीने या डोंगरावर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केली गेली आहे.तसेच गेल्या दोन वर्षापासून "सितसन इंडिया लिमिटेड डोंबिवली", या उद्योग समूहाच्या वतीने कोरोना काळातील कामाची दखल घेत मोठी आर्थिक मदत केली म्हणून डोंगरावर सुमारे दोन कि.मी.ची पाईपलाईन करून ठिबकची सुविधा करता आली . निसर्ग मित्र समिती, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजना विभागाला खऱ्या अर्थाने या परिसरातील आदिवासी लोकांना भविष्यात आर्थिक फायदा उपलब्ध व्हावा, रोजगाराची समस्या सुटावी तसेच वृक्ष लागवडीतून पर्यावरण संवर्धन अशा विविध हेतूने विविध फळझाडांची या दिवशी लागवड करण्यात आली. डोंगरावर ठिबक सिंचनची सुविधा उपलब्ध झाल्याने परिणामी वृक्ष लागवड व संवर्धन यशस्वीरित्या होणार आहे\या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व शिबिराचे उद्घाटक म्हणून कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील रासेयोचे संचालक डॉ. सचिन नांद्रे उपस्थित होते, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, निसर्ग मित्र समितीचे उपाध्यक्ष प्राचार्य बी. एम. भामरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून निसर्ग मित्र समितीचे कार्याध्यक्ष व साक्री तालुका प्रवासी महासंघाचे अध्यक्ष सुरेश पारख होते .

अन्य मान्यवरांत साक्री तालुका रासेयो प्रमुख डॉ. हेमंत पाटील, पिंपळनेर महाविद्यालयाचे रासेयो प्रमुख डॉ. घरटे सर. डॉ साळवे सर, डॉ कदम सर,प्रा. प्रदिप साळवे, निजामपूर महाविद्यालयचे रासेयो सहाय्यक कार्यक्रमाधिकारी डॉ कुलकर्णी, दहिवेल महाविद्यालयाचे रासेयो प्रमुख डॉ. पाटील सर, सि.गो पाटील महाविद्यालयाचे रासेयो प्रमुख राठोड सर टिव्ही चैनल चे प्रकाश वाघ साक्री उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक डॉ. सचिन नांद्रे यांनी आपल्या मनोगतात रासोयोच्या माध्यमातून विविध योजना, विद्यार्थी हित जोपासून राबवले जातात. शिबिराच्या माध्यमातून विविध प्रकारचे संस्कार रुजवले जातात, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी विविध पुरस्कारही दिले जातात. थोडक्यात काय तर,रासेयो. हे खुले व्यासपीठ असून यात विद्यार्थी खऱ्या अर्थाने घडविले जातात,असा विश्वास व्यक्त केला. आजच्या शिबीरात



तालुक्यातील सर्वच महाविद्यालयांनी एकत्र येऊन या डोंगराला वृक्ष लागवडीसाठी दत्तक घेतले व या माध्यमातून श्रम संस्कार ही रूजवला जाणार असल्याचे सांगितले म्हणून या शिबिराच्या संयोजकांचे विशेष कौतुक केले. या ओसाड डोंगरावर वृक्ष लागवड करून हिरवागार करण्याचा संकल्प ऐकून आनंद झाल्याचे सांगितले . पण यासाठी सर्वांचे प्रामाणिक योगदान व सहकार्य फायदेशीर ठरतील असेही स्पष्ट केले . भविष्यात हा प्रकल्प यशस्वी होण्यासाठी निवासी शिबिर देण्याविषयीही आपण सकारात्मक विचार करू अशीही ग्वाही दिली.

सीतसन इंडिया उद्योग समूहाचे प्रमुख नांद्रे साहेबांनी केलेल्या आर्थिक मदतीबद्दल त्यांनी विशेष कौतुक केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य बी. एम. भामरे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांना अशा शिबिराच्या माध्यमातून आपले व्यक्तीमत्व घडवण्यासाठी व जीवनात यशस्वी होण्यासाठी मोठी संधी मिळत असल्याचे नमूद करत ,या पुढील काळात येवू घातलेल्या सा-या सामाजिक समस्यां सोडवण्याची ताकद केवळ नव युवकांमधेच असल्याचे सांगून , या शिबिरातील शिबीरार्थींनी वृक्ष लागवड व संवर्धना बरोबर श्रम संस्काराचे मुल्य अंगिकारण्याचे आवाहन केले. तसेच आपल्या देशाला व तालुक्याला वृक्ष प्रेमी बिश्णोई समाज, सुंदरलाल बहुगुणा व बारीपाड्याच्या चैत्राम पवार यांची महान परंपरा असल्याचे व ती प्रेरणादायी उदाहरणं असल्याचे सांगून त्यांच्याकडून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. सर्वांना भोजनाची व्यवस्था केली होती . या कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते व निसर्ग मित्र समितीचे कार्याध्यक्ष व उद्योजक सुरेश पारख, मालपुर चे माजी सरपंच पंकजभामरे,सी.जी.भामरें,नवजीवन देवरे,मनोहर भामरे,सुहास सोनवणे, विलास देसले, सुनील भामरें, जयेश सोनवणे, भूषण भामरे, नितीन सोनवणे, कैलास जाधव,सागर खैरणार, मिलिंद नांद्रे आदिंनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले.तीनशे विद्यार्थी सहभागी झालेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिनेश माळी यांनी तर, प्रास्ताविक डॉ. कैलास वाघ यांनी केले.संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन- नियोजन प्रा. डॉ. अजय नांद्रे यांनी केले, पाहुण्यांचा परिचय डॉ अभिजित भामरे यांनी केला, तर आभार डॉ. मनीषा पाटील यांनी मानले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेही सहकार्य लाभले.









खान्देश खबर

व्हॉटस्‌अपवर अंक

# साक्री तालुका निसर्ग मित्र समितीचे उजाड माळरानावर हिरवाई निर्माण करण्याचे कार्य कौतुकास्पद –आ.गावीत



**कासारे**

**★खान्देश खबर वृत्त★**

ऑक्सिजन तुटवड्याचे चटके सोसत असलेल्या कोविड काळात साक्री तालुका निसर्ग मित्र समितीने या उजाड डोंगराच्या माळरानावर हिरवाई निर्माण करण्याचे हाती घेतलेले काम अतिशय कौतुकास्पद व प्रेरणादायी असून या कामी शासन स्तरावर जी काय मदत लागेल ती आवश्य केली जाईल अशी ग्वाही देत समिती सदस्यांच्या कामाचे आमदार मंजूळाताई गावीत यांनी कौतूक केले

गेल्या रविवारी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून मालपूर रामनगर भिल्ल वसाहती नजीकच्या डोंगरावर साक्री तालुका व कासारे–मालपूर निसर्ग मित्र समितीने आयोजित केलेल्या अण्णाभाऊ साठे स्मृतीदिन वृक्ष लागवड व निसर्ग प्रेमींच्या मेळाव्यात साक्रीच्या आमदार सौ. मंजूळाताई गावीत प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धुळे जिल्हा निसर्ग मित्र समितीचे जिल्हाध्यक्ष डी.बी.पाटील हे होते तर प्रमूख पाहूणे म्हणून निसर्ग मित्र समितीचे संस्थापक प्रेमकुमार अहिरे, जि.प.सदस्य गोकुळसिंह परदेशी, साक्री तालुका शिवसेना प्रमुख पंकज मराठे, कासाऱ्याचे प्रथम लोकनियुक्त व धुळे जिल्हा सरपंच संघटनाध्यक्ष विशाल देसले मालपूरच्या सरपंच घमाबाईभिल, उपसरपंच भारतीताई भामरे, मालपूर ग्रामपंचायतीचे गट नेते नयनेश भामरे,साक्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे व डॉ.पी. एस. सोनवणे, पिंपळनेरचे प्राचार्य डॉ. एस. टी.सोनवणे, दहीवेलचे प्राचार्य डॉ. एस. सी.अहिरे, निसर्ग मित्र समितीचे जिल्हा उपाध्यक्ष विलास देसले , तालुकाध्यक्ष राकेश जाधव, उपाध्यक्ष प्राचार्य बी.एम् भामरें, कार्याध्यक्ष सुरेश पारख, निसर्ग प्रेमी प्रा.अजय नांद्रें, मिलिंद नांद्रें, सुहास सोनवणे, ऋषिकेश सोनवणे, दिपक कुवर आणि पत्रकार विद्यानंद पाटील, मुख्याध्यापक शामराव आहिरराव, शिक्षिका सुनंदा पाटील, सुभाष मोहिते पाटील, पोलीस हक्क संरक्षण संघटनेच्या तालुका अध्यक्ष वंदना खैरनार, शितल अहिरराव, मालपूर ग्रा.पं. माजी सरपंच पंकज भामरे, विलासराव सोनवणे, अशोक सोनवणे, महेश बोरसे, गजेंद्र भामरे मराठा सेवा संघाचे जिल्हा उपाध्यक्ष दिपक नांद्रें, प्रा. युवराज काकुस्ते आदि उपस्थित होते.

आमदार गावीत पुढे म्हणाल्या की, वृक्ष लागवड व संवर्धं ही काळाची गरज असून हे राष्ट्रीय काम साक्री तालुका निसर्ग मित्र समिती करते आहे, ही खूप प्रेरणादायी बाब असून आपल्या कार्यास आमचे पर्यावरण मंत्री अदित्य ठाकरे यांच्या सहकार्याने हवी ती मदत आपण करु व तालुक्याच्या विकासात्मक अनेक कामांचे आपण प्रस्ताव पाठविले असून त्यास त्यांनी हिरवा कंदील दिला असल्याचे त्यांनी नमूद करत उपस्थित आदिवासी रामनगर वासियांना कोविडची लस घेण्याचे आवाहन केले.

अध्यक्ष स्थानावरून बोलतांना डी.बी.पाटील व निसर्ग मित्र समितीचे संस्थापक प्रेमकुमार अहिरे यांनी साक्री तालुका निसर्ग मित्र समितीचे वृक्ष लागवड अभियानास दिलेल्या प्रतिसादा बद्दल समिती पदाधिकारी व सदस्यांचे अभिनंदन केले व धन्यवाद दिलेत. त्यांनी निसर्ग मित्र समितीच्या वतीने आमदार गावितांचा कोविड योद्धा म्हणून गौरवही केला.

यावेळी कार्याध्यक्ष सुरेश पारख व प्रा. अजय नांद्रें यांनी रामनगर ही आदिवासी वसाहत आम्ही दत्तक घेत असून येथल्या प्रत्येक कुटुंबाला मोफत गॅस व विज उपलब्ध करून देणे, शुद्ध पाणी पुरवठा, आरोग्य सुविधा, विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा, मोफत पिठ गिरणी आदि सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची व हे स्थळ भावी पर्यटन स्थळ म्हणून उदयास आणू असा मनोदय व्यक्त केला.

याकामी मालपूरचे डोंबिवली स्थीत उद्योगपती रामराव सोनू नांद्रें ( सितसन इंडिया कं ) यांच्या भरीव अर्थसाह्यातून हे काम उभे रहात असल्याचे सांगून त्यांचे जाहिर आभार व्यक्त केले व अजून अशा निसर्ग प्रेमींनी मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे हस्ते प्रारंभीच अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे व वृक्षांचे पूजन करून सुरूवात झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य बी. एम.भामरे यांनी केले व सुरेश पारख यांनी सर्वांना वृक्ष प्रतिज्ञा दिली. सुत्र संचालन विलास देसलेंनी व आभार प्रा. प्रदिप सावळे यांनी मानले.

दिव्य मराठी
दिव्य सिटी
धुळे, रविवार, २५ जुलै २०२१ । आषाढ कृ. २, शके १९४३

# मालपूरला ३०१ वृक्षांची लागवड

प्रतिनिधी । धुळे

साक्री तालुका निसर्गमित्र समितीतर्फे वृक्षारोपण मोहीम राबवण्यात येते आहे. त्यानुसार मालपूर येथील रामनगर जवळील डोंगरावर ३०१ वृक्षांचे रोपण करण्यात आले.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त हा उपक्रम राबवला. समितीतर्फे साक्री तालुका व कासारे-मालपूर परिसरात वृक्षारोपण होते आहे. निसर्गमित्र समितीचे जिल्हाध्यक्ष डी. बी. पाटील अध्यक्षस्थानी होते. आमदार मंजुळा गावित यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. समितीचे संस्थापक प्रेमकुमार अहिरे, गोकुळसिंह परदेशी, शिवसेनेचे साक्री तालुकाप्रमुख पंकज मराठे, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष विशाल देसले, मालपूरचे सरपंच घमाबाई भील, उपसरपंच भारतीताई भामरे, नयनेश भामरे, प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, डॉ.पी.एस. सोनवणे, प्राचार्य डॉ. एस.टी. सोनवणे, प्राचार्य डॉ. एस.सी. अहिरे, विलास देसले, विजय वाघ, प्राचार्य भिकाजी देवरे, आर. आर. सोनवणे, राकेश जाधव, प्राचार्य बी.एम. भामरे, कार्याध्यक्ष सुरेश पारख, वैभव पाटील, हर्षल महाजन, प्रा. अजय नांद्रे, मिलिंद नांद्रे, सुहास सोनवणे, ऋषिकेश सोनवणे, दीपक कुवर, विवेकानंद पाटील, विलासराव सोनवणे, अशोक सोनवणे, महेश बोरसे, गजेंद्र भामरे, मराठा सेवा संघाचे जिल्हा उपाध्यक्ष दीपक नांद्रे उपस्थित होते. सुरेश पारख व अजय नांद्रे यांनी रामनगर आदिवासी वसाहत दत्तक घेण्याची घोषणा केली. तसेच या भागातील प्रत्येक कुटुंबाला मोफत गॅस आणि शुद्ध पाणी पुरवठा करण्याचे आश्वासन दिले. प्राचार्य बी. एम. भामरे यांनी प्रास्ताविक केले. विलास देसले यांनी आभार मानले.



मालपूर येथे ३०१ वृक्षांचे रोपण करताना निसर्ग मित्र समितीचे पदाधिकारी.






दैनिक
लक्ष महाराष्ट्र
संमिश्र
मंगळवार, दि. २७ जुलै २०२१




# उजाड माळरानावर हिरवळ निर्माण करण्याचे कार्य कौतुकास्पद!

## आ.मंजुळा गावीत यांचे प्रतिपादन, निसर्ग मित्र समितीने राबविला स्तुत्य उपक्रम

साक्री । प्रतिनिधी




ऑक्सिजन तुटवड्याचे चटके सोसत असलेल्या कोविड काळात साक्री तालुका निसर्ग मित्र समितीने या उजाड डोंगराच्या माळरानावर हिरवाई निर्माण करण्याचे हाती घेतलेले काम अतिशय कौतुकास्पद व प्रेरणादायी असून या कामी शासन स्तरावर जी काय मदत लागेल ती आवश्य केली जाईल अशी ग्वाही देत समिती सदस्यांच्या कामाचे आमदार मंजूळा गावीत यांनी कौतूक केले.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून मालपूर रामनगर भिल्ल वसाहती नजीकच्या डोंगरावर ,साक्री तालुका व कासारे- मालपूर च्या निसर्ग मित्र समिती ने आयोजित केलेल्या अण्णा भाऊ साठे स्मृतीदिन, वृक्ष लागवड व निसर्ग प्रेमींच्या मेळाव्यात प्रसंगी साक्री च्या आमदार मंजूळाताई गावीत प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धुळे जिल्हा निसर्ग मित्र समितीचे जिल्हाध्यक्ष डी.बी.पाटील हे होते तर,प्रमूख पाहूणे म्हणून निसर्ग मित्र समितीचे संस्थापक प्रेमकुमार अहिरे, जि.प.सदस्य गोकुळसिंह परदेशी, साक्री तालुका शिवसेनाप्रमुख पंकज मराठे, कासाऱ्याचे प्रथम लोकनियुक्त व धुळे जिल्हा सरपंच संघटनाध्यक्ष विशाल देसले मालपूर च्या सरपंच घमाबाई भिल, उपसरपंच भारती भामरे,मालपूर ग्रामपंचायतीचे गट नेते नयनेश भामरे,साक्रीच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे व डॉ. पी.एस. सोनवणे, पिंपळनेरचे प्राचार्य डॉ. एस. टी. सोनवणे, दहीवेलचे प्राचार्य डॉ. एस.सी.अहिरे, निसर्ग मित्र समिती चे जिल्हा उपाध्यक्ष विलास देसले, तालुकाध्यक्ष राकेश जाधव, उपाध्यक्ष प्राचार्य बी.एम् भामरें, कार्याध्यक्ष सुरेश पारख तसेच प्रा.अजय नांद्रें, मिलिंद नांद्रें, सुहास सोनवणे, ऋषिकेश सोनवणे, दिपक कुवर, विद्यानंद पाटील, मुख्याध्यापक शामराव आहिरराव, शिक्षिका सुनंदा पाटील, सुभाष मोहिते पाटील, पोलीस हक्क संरक्षण संघटनेच्या तालुका अध्यक्ष वंदना खैरनार, विलासराव सोनवणे, अशोक सोनवणे, महेश बोरसे, गजेंद्र भामरे, मराठा सेवा संघाचे जिल्हा उपाध्यक्ष दिपक नांद्रें, आदि मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी अध्यक्ष स्थानावरून बोलतांना डी.बी.पाटील व निसर्ग मित्र समितीचे संस्थापक प्रेमकुमार अहिरे यांनी साक्री तालुका निसर्ग मित्र समितीच्या वृक्ष लागवड अभियानास दिलेल्या प्रतिसादा बद्दल समिती पदाधिकारी व सदस्यांचे अभिनंदन केले व धन्यवाद दिलेत.त्यांनी निसर्ग मित्र समिती च्या वतीने आमदार गावितांचा कोविड योद्धा म्हणून गौरवही केला.

या प्रसंगी कार्याध्यक्ष सुरेश पारख व प्रा. अजय नांद्रें यांनी रामनगर ही आदिवासी वसाहत आम्ही दत्तक घेत असून येथल्या प्रत्येक कुटुंबाला मोफत गॅस व विज उपलब्ध करून देणे ,शुद्ध पाणी पुरवठा, आरोग्य सुविधा , विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा ,मोफत पिठ गिरणी . आदि सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची,व हे स्थळ भावी पर्यटन स्थळ म्हणून उदयास आणू असा मनोदय व्यक्त केला. तसेच याकामी मालपूरच्याच डोंबिवली स्थीत उद्योगपती रामराव सोनू नांद्रें ( सितसन इंडिया कं ) यांच्या भरीव अर्थसाह्यातून हे काम उभे रहात असल्याचे सांगून त्यांचे जाहिर आभार व्यक्त केले व अजून अशा निसर्ग प्रेमींनी मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य बी.एम. भामरे यांनी केले व सुरेश पारख यांनी सर्वांना वृक्ष प्रतिज्ञा दिली तर सुत्रसंचालन विलास देसले व आभार प्रा. प्रदिप सावळे यांनी मानले.

12:07

4 Augst 2021 - Read-only

Read Only - You can't save cha...



# मानवाच्या निकोप व शाश्वत विकासासाठी पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज



## महिलेच्या मृत्यूप्रकरणी दोन महिन्यानंतर सहाय्यक अभियंत्यासह वायरमनवर गुन्हा

## शेतकऱ्यांकडून ज्वारी व मका खरेदी करीत असतांना होते फसवणूक



## धुळे जिल्ह्यातील आस्थापना, दुकाने रात्री आठ वाजेपर्यंत सुरू राहणार

## जैताणे-निजामपूर येथे ओबीसी आरक्षणावर चर्चा



# गळफासाने तरुणाची राहत्या घरात आत्महत्या

## पान १ वरून ...

### चिचवार येथे...

### सातवा वेतन आयोग...

### राज्यपालांकडून...

## जिल्ह्यात १४ ऑगस्टपर्यंत मनाई आदेश

## मेडीकल प्रमाणेच केशकर्तनालय सुरु राहू द्यावीत - प्रकाश सोनवणे



### निधन वार्ता



खान्देश चौफेर

मगंळवार दि ३ ऑगस्ट २०२१

# शाश्वत विकासासाठी पर्यावरण संवर्धन काळाजी गरज असून त्यासाठी तरूणांनी पुढे यावे

# प्राचार्य बी.एम.भामरे यांचे प्रतिपादन

साक्री---मानवाच्या निकोप व शाश्वत विकासासाठी पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून त्यासाठी तरूणांनी पुढे आलं पाहिजे असे प्रतिपादन प्राचार्य बी.एम्. भामरे यांनी केले. ङ्ग येथील त्रिमुर्ती शिक्षण संस्थेच्या,श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर देसले विज्ञान महाविद्यालयाच्या ,भूगोल व आय.क्युं. ए.सी.विभागांतर्गत गेल्या २ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेल्या एक दिवशीय, राष्ट्रीय ऑनलाईन वेबीनार मध्ये प्रमुख वक्ते म्हणून पर्यावरण तथा निसर्ग संवर्धन व तरुणाई या विषयावरील व्याख्यानात प्राचार्य भामरे बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.एस्. सोनवणे,तर प्रमूख पाहूणे म्हणून संस्थेच्या सचिव डॉ. मंगलाताई देसले,संस्थाध्यक्षा मृणाल देसले ,संचालक डॉ अजिंक्य देसले ,डॉ.श्रृतिका देसले, व या वेबीनारचे उद्घाटक म्हणून दहिवेलच्या उत्तमराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश अहिरे उपस्थित होते. ङ्ग या प्रसंगी प्राचार्य बी. एम्. भामरे म्हणाले की,नुकतेच आपल्या मानवजातीला कोरोनाच्या उपचारांतर्गत ऑक्सिजनच्या तुटल्यामुळे लाखोंना जसे आपले प्राण गमवावे लागलेत, तसेच गेल्या आठवड्यात कोकणात झालेल्या अतिपर्जन्यवृष्टीने व त्यामुळे कोसळलेल्या दरडी व यामुळे उद्ध्वस्त झालेले जनजीवन.अशा नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर ही होत असलेली वेबीनार संयुक्तिक असून यासाठी निवडलेला विषय ही समर्पक असल्याचे नमूद केले,व पुढे त्यांनी जागतिक पातळीवर पर्यावरण संवर्धनार्थ होत असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेतांना सांगितले की, गेल्या ४८ वर्षापासून विविध नैसर्गिक आपत्तींचा थीम घेत , जागतिक पर्यावरण दिन साजरे केले जात आहेत.तसेच छ.शिवरायांनी आपल्या आज्ञापत्रात आपल्या कारभा-यांनी वृक्ष संवर्धनाची कशी काळजी




घ्यावी हे त्यांनी आज्ञापत्राचे वाचन करून स्पष्ट केले.तसेच राजस्थानातल्या बिश्नोई समाजातील महिलांचे जगातले छेडलेले पहिले चिपको आंदोलन,सुंदर लाल बहुगुणा यांचे गडवाल व टेहरीचे आदोलन,मेधा पाटकरांचे नर्मदा बचाव आंदोलन ,हे सारे माईल स्टोन्स असल्याचे सांगून. यांच्या पासून प्रेरणा घेण्याचे तरूणांना आवाहन केले .वृक्ष लागवड आता लोकचळवळ व्हावी,व यासाठी शक्य तेथे देशी वृक्षांची विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने,जसे प्राचार्य डॉ. राजेंद्र आहिरे यांनी त्यांच्या आई वडिलांच्या दशक्रियाविधी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ केलेली वृक्ष लागवड व वृक्ष वाटप सारख्या उपक्रमांचे व वाढदिवसानिमित्त, सत्कार समारंभ प्रसंगी वृक्षांचे रोप देवून साजरा करण्याचे आवाहन केले. यासाठी त्यांनी निसर्ग मित्र समिती च्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध कार्यक्रमांचा आढावाही सादर केला.व शेवटी तरूणांनी स्वताचे सामर्थ्य ओळखून आपल्या करियर बरोबर निसर्ग संवर्धनाचा ध्यास घेण्याचे आवाहन केले. ङ्ग या प्रसंगी संस्था अध्यक्षा मृणाल देसलेंनी वेबीनारला शुभेच्छा तर उद्घाटक प्राचार्य डॉ. सुरेश अहिरेंनीही मार्गदर्शन करून वेबीनार च्या उद्घाटनाची घोषणा केली. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.पी.एस. सोनवणे यांनी सर्व कार्यक्रमाचा आढावा घेवून महाविद्यालयाच्या माध्यमातून वृक्ष लागवड व संवर्धनाचे कार्य हाती घेतलेले असल्याचे नमूद करत वक्त्यांच्या मनोगतांबद्दल गौरवोद्गार काढले.ङ्ग सुमारे अडीच तास चाललेल्या या वेबीनार चे प्रास्ताविक समन्वयक डॉ.अजय नांद्रेनी, सुत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय डॉ.अभिजित भामरे यांनी तर आभार प्रदर्शन भटू पाटील यांनी केले.

**Group Photo of the Volunteer Participants at University level One Day Camp at Adopted Village Ramnagar with the NSS University Officer Dr. Sachin Nandre, Social worker Mr. Sureshbhau Parakh, Prin. B.M.Bhamare, Mr. Bhamare Prof. Gharate, Prof. Kulkarni, Prof.J.U.Patil Prof. Nandre, Dr.Wagh**





**Prin. Mr. B.M.Bhamare is guiding the students regarding the importance of seed sowing and Tree Plantation in University level One Day Camp at Adopted Village Ramnagar**




शिक्षण संस्थेचे,
जि. धुळे

# मानवाच्या निकोप व शाश्वत विकासासाठी पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज

[illegible]



# Evidences of Success of the Best Practice







































